(सादीक अब्दुल शेख वि. मुबारक दाऊद शेख)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ८८५/२०१९ मधील निशाणी क्रमांक ९ खालील आदेश**
**(CNR No. MHSO130009882019)**

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज वादीने दाखल केलेल्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास उशीर झाला असून झालेला उशीर माफ करण्यात येवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळावी याकरिता सादर केला आहे. सदर अर्जात प्रतिवादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादीस दाव्याचे समन्स पूर्वीच मिळाले होते परंतु कोव्हीड-१९ या आजारामुळे लॉकडाऊन करण्यात आले असल्यामुळे तसेच प्रतिवादी अशक्य वयोवृध्द आजारी असल्यामुळे दरम्यानच्या कालावधीमध्ये घराबाहेर येऊन वकीलांना माहिती व कागदपत्रे देऊ शकला नाही. सबब कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येऊन कैफियत स्वीकारण्यात यावी.

२. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणेमध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीस दाव्याचे समन्स दि.३/३/२०२० रोजी प्राप्त झाले असून दि.१३/३/२०२० तारीख नेमण्यात आली होती. परंतु प्रतिवादी दि.२०/१०/२०२० रोजी हजर झाले आहेत. अर्जातील कारण चुकीचे आहे तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर अर्ज मंजूर करावयास झाल्यास प्रतिवादीवर रु.२०००/- खर्च बसवून अर्ज मंजूर करावा.

३. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा मिळकतीचे वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरिता आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादीस समन्स दि.३/३/२०२० रोजी बेलिफ अहवालाप्रमाणे प्राप्त झाल्याचे दिसते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ प्रमाणे वादीच्या दाव्यास प्रतिवादीने समन्स प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आत कैफियत दाखल करायची असते. त्यानंतरही ९० दिवसाची मुदत न्यायालयाच्या परवानगीने दिली जावू शकते. सदरच्या प्रकरणात प्रस्तुत अर्ज दाखल करण्याआधी १७ महिने कालावधी संपला होता. वादीच्या दाव्यास वेळेत कैफियत दाखल केली नाही त्यामुळे झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केली आहे. परंतु सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादीस खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. कोव्हीड-१९ ची परिस्थिती लक्षात घेता सदर अर्ज प्रतिवादीवर जास्त खर्च बसवून मंजूर करणे योग्य व संयुक्तिक नाही. सबब, पुढील

प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादीने रक्कम रुपये रु.१००/– (रक्कम रुपये शंभर) वादीस खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने वादीस खर्च दिल्यानंतर त्याची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

बार्शी. (एन. एस. सबनीस)

दिनांकः– २१/०९/२०२१ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y.V. Sital |
| (b) | Court | : | Shri. N.S.Sabnis<br>4th Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 21.09.2021 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 22.09.2021 |